Astro • Puja • Vastu

॥ श्री गणेशाय नमः ॥

# हरी ॐ धार्मिक पूजा विधी केंद्र

ज्योतिष आणि वास्तु सल्लागार

## षोडश संस्कार

हिंदू धर्मियांचे सोळा संस्कार विधी आहेत. गर्भधारणेपासून ते विवाह पर्यंत हिंदू व्यक्तीवर आई-वडील व गुरूंकडून ज्या वैदिक विधी केल्या जातात त्यास संस्कार असे म्हटले आहे. हिंदूंच्या पूर्वजांनी मानव जातीच्या कल्याणासाठी संस्कारांची रचना केली आहे संस्कारांमुळे ईश्वराचे स्मरण होते. माणसाचे व्यक्तिगत जीवन निरामय,संस्कारित विकसित व्हावे त्याद्वारे उत्तम चारित्र्य संपन्न सुसंस्कारित पुरुष निर्माण व्हावे त्याद्वारे चांगला समाज व एक चांगली सुसंस्कारित बलशाली राष्ट्र निर्माण व्हावे हा यामागील प्रमुख उद्देश आहे. संस्कार म्हणजे शुद्ध करणे चांगले करणे, संस्कारामुळे शरीर मन आत्मा या तिन्हींची शुद्धी होते सोळा संस्कार पुढील प्रमाणे आहेत १) गर्भाधान, २) पुंसवन, ३) सीमंतोनयन, ४) जातकर्म, ५) नामकरण, ५) निष्क्रमण, ७) अन्नप्राशन, ८) चौलकर्म, ९)उपनयन, १०) महानामनीव्रत, ११) महाव्रत, १२) उपनिषद, १३) गोदानव्रत, १४) केशांत, १५) समावर्तन आणि १६) विवाह

हिंदू धर्मशास्त्राप्रमाणे आपल्या संस्कृतीत वरील सोळा संस्कार सांगितले आहेत. कित्येक ग्रंथकारांनी ४८, कोणी २५ असे संस्कार सांगितले आहेत. या सोळा संस्कारांशिवाय दोहदपूर्ती (डोहाळेजेवण), अष्टमांगल्य (अठांगूळ - हा खरेतर गर्भाधानानंतरचे संस्कार केले नसतील तर करावयाचा प्रायश्चितात्मक विधी आहे), षष्ठीपूजन, आंदोलनारोहण (पाळण्यात घालणे), दुग्धप्राशन (गायीचे दूध पाजण्यास प्रारंभ करणे), कटिसूत्रधारण व भुम्युपवेशन (कमरेत दोरा बांधून बालकाला भूमीवर बसवणे), प्रथम केशखंडन (जावळ), वर्धापन (वाढदिवस), अक्षरारंभ (अक्षरओळख) इत्यादि विधी स्थळकाळानुरूप व विशिष्ट कुलाचाराप्रमाणे केले जातात.

ज्यावेळी एखाद्या घरात शुभकार्य असते त्यावेळी या गोष्टी सविस्तर माहित असल्यास कार्य सुव्यवस्थित पार पडते असा अनुभव आहे. म्हणून प्रत्येक संस्कारात काय वैशिष्ट्य आहे याची पूर्वकल्पना असणे अत्यंत आवश्यक आहे. आपल्या पुर्वजांनी संस्कार योजना केली ती बहुत विचारपूर्वकच केलेली आहे. कुंभार जसा मातीच्या गोळ्याला आकार देतो, तसे आपली संतती योग्य झाली पाहिजे. तर प्रथमपासून म्हणजे गर्भाधान संस्कारापासून काळजीपूर्वक ते संस्कार समजावून घेतले तर त्यातील गांभिर्य आपणाला निश्चितच समजेल.

प्रत्येक मनुष्य हा स्वतःच्या निराळ्या पद्धतीने जीवन जगत असतो. जीवन जगतांना सुखांचा वर्षाव होतो, दुःखांचा डोंगर कोसळतो, दुःखरूपी सागरातून तरून जाण्यासाठी लहानपणीची "संस्कारनौका" मग साहाय्य करते. भारतीय संस्कृतीत संस्काराला फार महत्त्वआहे.मनुष्य जन्माला आल्यापासून मरणापर्यंत त्यावर विविध संस्कार करावे लागतात.


## HARI OM DHARMIK PUJA VIDHI KENDRA

योगेशशास्त्री ढवळे (गुरुजी) : 95944 28749 | निलेशशास्त्री ढवळे (गुरुजी) : 86524 02078

**SANPADA OFFICE**
Office No.8, 1st Flr, Shiva Triveni Galleria CHS.,
Plot No. 13, Sector 8, Sanpada, Navi Mumbai

**GOVANDI OFFICE**
Shri Swaybhu Hanuman Mandir, Deonar
Mahanagarpalika Vasahat, Govandi, Mumbai.

hariom astrologers | hariom astrologers | hariom_astrologers
hariomastrologers@gmail.com | www.hariomastrologers.com